# नागरिकांची सनद

26 ऑगस्ट, 1982 रोजी चंद्रपूर जिल्हयातून वेगळा झालेला गडचिरोली जिल्हा हा महाराष्ट्रामध्ये आदिवासी व नक्षलग्रस्त म्हणून प्रसिध्द आहे. याचे भौगोलिक क्षेत्रफळ 14,91,500 हेक्टर आहे. गडचिरोली जिल्हयामध्ये छत्तीसगड, तेलंगाना आणि महाराष्ट्र या तीनही राज्यांच्या सिमा सोमनूर येथे मिळतात. या जिल्हयात वैनगंगा, प्राणहिता, गोदावरी, इंद्रावती यासारख्या प्रमुख नद्या वाहतात तसेच पर्वतरांगा, वनसंपत्ती व लोखंड, चुनखडी, तांबे, दगडी कोळसा, बांबू, तेंदूपत्ता व अनेक खनिज संपत्तीनी संपन्न असलेला हा जिल्हा आहे.

या जिल्हयात कोसा उत्पादनासाठी आरमोरी हे गांव प्रसिध्द आहे. तसेच अनेक निसर्गरम्य ठिकाण व तिर्थस्थळे आहेत त्यात चामोर्शी जवळील वैनगंगा नदीच्या काठावरील मार्कंडा तर सिरोंचा जवळ प्राणहिता या नदीच्या काठावरील कालेश्वर मंदिर प्रसिध्द आहे.

1) जिल्हा व सत्र न्यायालय, गडचिरोली हे दिनांक 03/07/2004 पासून अस्तित्वात आले. त्यापूर्वी गडचिरोली जिल्हा हा चंद्रपूर जिल्हयाशी संलग्न होता. त्यामुळे गडचिरोली जिल्हयाची प्रशासकीय कामे चंद्रपूर जिल्हा न्यायालयातून होत होती. दिनांक 03/07/2004 पासून गडचिरोली जिल्हा न्यायालय हे स्वतंत्ररित्या काम करीत आहे. जिल्हा न्यायालय हे उच्च न्यायालय तथा विधी व न्याय विभागाच्या मार्गदर्शनानुसार तसेच निर्देशानुसार काम करते. गडचिरोली येथे सध्या खालील न्यायालय कार्यरत आहेत.

1. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायालय, गडचिरोली
2. जिल्हा न्यायाधिश-1 व अतिरिक्त सत्र न्यायालय, गडचिरोली.
3. जिल्हा न्यायाधिश-1 व अतिरिक्त सत्र न्यायालय, अहेरी
4 दिवाणी न्यायाधिश (वरिष्ठ स्तर), गडचिरोली.
5. मुख्य न्यायदंडाधिकारी, गडचिरोली.
6. सहदिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) तथा न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, गडचिरोली.
7. द्वितीय सहदिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) तथा न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, गडचिरोली.
8. तृतीय सहदिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) तथा न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, गडचिरोली.
9. चतुर्थ सहदिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) तथा न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, गडचिरोली.
10. अतिरिक्त सहदिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) तथा न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, गडचिरोली.
11. दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) तथा न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, आरमोरी.

12. दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) तथा न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, देसाईगंज.
13. दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) तथा न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, कुरखेडा.
14. दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) तथा न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, धानोरा.
15. दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) तथा न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, चामोर्शी.
16. सहदिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) तथा न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, चामोर्शी.
17. दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) तथा न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, अहेरी.
18. दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) तथा न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, सिरोंचा.
19. बाल न्यायमंडळ, गडचिरोली.
20. ग्राम न्यायालय, कोरची.
21. ग्राम न्यायालय, मुलचेरा.

एकूण 12 तहसील पैकी गडचिरोली व्यतिरिक्त एकूण सात तालुक्याच्या ठिकाणी कनिष्ठ न्यायालये सध्या कार्यरत आहेत तसेच अहेरी येथे नव्याने दिनांक 22 जुलै, 2023 रोजी जिल्हा न्यायालय व अतिरिक्त सत्र न्यायालय स्थापन करण्यात आले आहे. कोरची व मुलचेरा या दोन तालुक्याच्या ठिकाणी ग्राम न्यायालय अनुक्रमे दिनांक 20/11/2013 व दिनांक 11/01/2014 रोजी नव्याने स्थापन करण्यात आले आहे. कोरची तालुक्यातील ग्राम न्यायालयाचे न्यायाधिकारी म्हणुन सद्या कुरखेडा येथील दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) तथा न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी हे काम पाहतात तर चामोर्शीचे दिवाणी न्यायाधिश (कनिष्ठ स्तर) तथा न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी हे मुलचेरा ग्राम न्यायालयाचे न्यायाधिकारी म्हणुन काम पाहतात. तसेच एटापल्ली व भामरागड या दोन तालुक्याच्या ठिकाणी ग्राम न्यायालये प्रस्तावित आहेत.

2) प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश हे गडचिरोली जिल्हयाचे प्रमुख न्यायाधिश असून जिल्हयातील सर्व न्यायालयांचे न्यायीक व प्रशासकीय प्रमुख म्हणून कामकाज पाहतात व इतर कनिष्ठ न्यायालये त्यांच्या अधिपत्खाली काम करतात. फौजदारी प्रकरणांसाठी मुख्य न्यायदंडाधिकारी हे जिल्हयाच्या ठिकाणी प्रमुख न्यायीक अधिकारी असून फौजदारी प्रकरणे ही त्यांचे न्यायालयात दाखल केली जातात व त्यानंतर क्रमवारीने प्रत्येक न्यायालयाकडे प्रकरणे वर्ग करण्यात येतात.

दिवाणी मामल्यांसाठी दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) हे जिल्हयाच्या ठिकाणी मुख्य न्यायीक अधिकारी असतात. दिवाणी प्रकरणे सुरुवातीला दिवाणी न्यायालय (वरिष्ठ स्तर) या न्यायालयात दाखल करण्यात येतात व त्यानंतर ती सहदिवाणी न्यायालय (कनिष्ठ स्तर) यांचेकडे क्रमवारीने पाठविण्यात येतात. तालुका स्तरावरील फौजदारी व दिवाणी प्रकरणे दिवाणी न्यायालय (कनिष्ठ स्तर) तथा न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी यांचे न्यायालयात दाखल केली जातात.

दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) यांचेकडे रुपये 5,00,000/- (रुपये पाच लाख) पर्यंतची दिवाणी दावे चालविण्याचे अधिकार असतात तर दिवाणी न्यायालय (वरिष्ठ स्तर) या न्यायालयात रुपये 5,00,000/- च्या वरची प्रकरणे चालविण्यात येतात. तसेच दिवाणी न्यायालय (वरिष्ठ स्तर) या न्यायालयात शासनाविरुध्द दाखल केलेली भुसंपादनाची तसेच कामगारांसाठी नुकसान भरपाईची प्रकरणे तसेच हिंदु विवाह कायदा यासारखे विशेष कायदयाअंतर्गत प्रकरणे चालविल्या जातात.

बाल न्याय मंडळ हे वेगळे न्यायालय असुन ते दर शुक्रवारी रिमांड होम मध्ये भरविल्या जाते. बाल न्याय मंडळाचे अध्यक्ष सह-दिवाणी न्यायाधिश (कनिष्ठ स्तर) हे आहेत. त्यामध्ये 18 वर्षा खालील मुलांना बालसुधार गृह मध्ये ठेवून त्यांना सुधारण्याची संधी दिल्या जाते.

कनिष्ठ न्यायालयात दिवाणी व फौजदारी मामल्यात निर्णय झाल्यानंतर त्यावरचे अपील जिल्हा न्यायालयात दाखल करण्यात येते. तसेच काही भारतीय दंड विधान च्या कलम 302, 376 प्रमाणे खुन व बलात्काराची प्रकरणे कनिष्ठ न्यायालयात दाखल केली जातात. त्यानंतर जिल्हा न्यायालयाकडे चालविण्यासाठी सुपूर्द केली जातात. मोटार अपघात तसेच विशेष कायदया अंतर्गत जसे लाचलुचपत प्रतिबंधक कायदा, महाराष्ट्र विज मंडळ, अनुसुचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा, वाणिज्य (कमर्शिअल) विषयक प्रकरणे, बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा (पोक्सो), संघटित गुन्हे प्रकरणे (मोक्का), ठेवीदारांचे हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम (एमपीआयडी) तसेच निवडणुक याचीका जिल्हा विशेष न्यायालयात दाखल करण्यात येतात.

न्यायाधिशांना न्यायदान करतांना नेहमी दोन प्रकारे भुमिका बजवावी लागते. दिवाणी दाव्यांच्या वेळी त्यांना दिवाणी न्यायाधिश म्हणून संबोधले जाते तर फौजदारी गुन्हयांचे खटले निकालात काढतांना त्यांना न्यायदंडाधिकारी म्हणून काम करावे लागते.

उच्च न्यायालयाचे निर्देशान्वये जिल्हा न्यायाधिशांना तसेच तालुक्याच्या न्यायाधिशांना खालील प्रमाणे अधिकार असतात.

| अ.क्र | न्यायालयाचे नाव | दिवाणी | फौजदारी |
|---|---|---|---|
| 1 | जिल्हा व सत्र न्यायाधीश | कनिष्ठ न्यायालयाच्या निर्णयावर झालेल्या रुपये 10,00,000/ पर्यंतच्या अपीलांची सुनावणी जिल्हा न्यायालयात चालते. | सत्र न्यायाधीशांना कोणतीही शिक्षा देता येते. परंतु मृत्युदंड दिल्यास उच्च न्यायालयात शिक्षा कायम होण्यासाठी प्रस्ताव पाठवावा लागतो. |
| 2 | अप्पर जिल्हा व सत्र न्यायाधीश | कनिष्ठ न्यायालयाच्या निर्णयावर झालेल्या अपीलांची सुनावणी जिल्हा न्यायालयात चालते.<br><br>**<u>कमर्शिअल प्रकरणे :</u>**<br>1 कोटीचे वरील आर्थिक व्यवहाराचे प्रकरणे (कमर्शिअल) जिल्हा न्यायाधीश- 1 यांचेकडे चालविले जाते व त्यांचे आदेशावर उच्च न्यायालयात अपील दाखल होते. | अतिरिक्त सत्र न्यायाधीश यांना मृत्यूदंडासह कोणतीही शिक्षा देण्याचे अधिकार असतात. परंतु मृत्युदंड दिल्यास उच्च न्यायालयात प्रस्ताव पाठवावा लागतो. |
| 3 | मुख्य न्यायदंडाधिकारी | -- | सर्व प्रकारची फौजदारी प्रकरणे प्रारंभी मुख्य न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात दाखल केली जातात. मुख्य न्यायदंडाधिकारी यांना सात वर्षापर्यंत सक्त मजुरीची शिक्षा व अमर्यादित दंड करण्याचे अधिकार असतात. |
| 4 | दिवाणी न्यायाधीश | सर्व प्रकारची दिवाणी प्रकरणे प्रारंभी दिवाणी न्यायालय | |

| | | | |
|---|---|---|---|
| | (वरिष्ठ स्तर) | (वरिष्ठ स्तर) येथे दाखल करण्यात येतात. सर्व प्रकारचे 5,00,000/- रुपयाच्या वरचे दिवाणी दावे भुसंपादनाचे तसेच कामगारांना नुकसान भरपाई देण्याबाबतची प्रकरणे शासनाविरुध्द दाखल केलेली तसेच हिंदु विवाह विशेष कायदा, वारसान कायदा अंतर्गतची प्रकरणे चालविण्याचा अधिकार दिवाणी न्यायाधिश (वरिष्ठ स्तर) यांना असतो.<br><br>**<u>कमर्शिअल प्रकरणे :</u>**<br><br>1 कोटीपर्यंतचे आर्थिक व्यवहाराचे कमर्शिअल प्रकरणे चालविण्याचा अधिकार दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) यांना असतो व त्यांचे आदेशावर अपीलाची सुनावणी जिल्हा न्यायाधीश-1 यांचे न्यायालयात चालते. | -- |
| 5 | दिवाणी न्यायाधिश (क.स्तर) तथा न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी | रुपये 5,00,000/- पर्यंतची दिवाणी दावे चालविण्याचा अधिकार या न्यायालयाला असतो. | न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, यांना 5,00,000/- रुपये पर्यंत दंड व 3 वर्षापर्यंत सक्त मजुरीची शिक्षा देण्याचा अधिकार असतो. |

जिल्हा न्यायालयात प्रबंधकाचे एक पद असते. प्रबंधक हे जिल्हा न्यायाधीश व कर्मचा-यांमधील दुवा असतो. तसेच अधिक्षकांची दोन पदे असतात. त्यात एक अधिक्षक (प्रशासन/वित्त) तर दुसरे अधिक्षक (न्यायीक) म्हणून काम पाहतात. अधिक्षक (प्रशा./वित्त) हे प्रशासन, आस्थापना, संगणक, वित्त व बांधकाम इत्यादी विभागाचे प्रमुख म्हणून

काम पाहतात. तर अधिक्षक (न्यायीक) सांख्यीकी, मुददेमाल, निरिक्षण, अभिलेखागार, ग्रंथालय व मोटार अपघात दावे या विभागाचे प्रमुख म्हणून काम पाहतात. प्रत्येक विभागासाठी एक सहाय्यक अधिक्षक, वरीष्ठ लिपीक व कनिष्ठ लिपीक, प्रमुख बेलिफ, शिपाई वर्ग अशा प्रकारे सर्व विभागामध्ये कर्मचा-याची रचना केलेली असते. तसेच न्यायालयात पुरावा टंकलिखीत करण्याचे तसेच न्यायाधीशांना दिलेले न्यायनिर्णय इंग्रजी भाषेमध्ये साक्षदारांचे साक्षपुरावे संगणकावर टंकलिखीत करण्याचे काम लघुलेखक तसेच मराठी भाषेमध्ये साक्षदारांचे साक्षपूरावे संगणकावर टंकलिखीत करण्याचे काम वरिष्ठ लिपीक (बेंच) यांच्याकडे असते.

त्याचप्रमाणे दिनांक 09/03/2016 पासून न्यायालय व्यवस्थापकाची जिल्हा न्यायालय, गडचिरोली येथे पदस्थापना झाली आहे. मा.उच्च न्यायालयाने हे पद कंत्राटी पध्दतीने भरती केली आहे. न्यायालय व्यवस्थापक हे प्रबंधक, जिल्हा न्यायालय, गडचिरोली यांना प्रशासकीय कामात सहकार्य करीत असतात.

दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) या न्यायालयात अधिक्षकाचे एक पद असते ते प्रशासकीय व न्यायीक विभागाचे काम पाहतात तसेच या न्यायालयात 2 सहाय्यक अधिक्षक, वरिष्ठ लिपीक व कनिष्ठ लिपीक, प्रमुख बेलीफ, बेलीफ, शिपाई अशी कर्मचाऱ्यांची रचना असते तर तालुक्याच्या न्यायालयात एक सहाय्यक अधिक्षक, एक लघुलेखक, वरिष्ठ लिपीक व कनिष्ठ लिपीक आणि समंस, नोटीस तसेच जंगम जप्ती वारंटची अंमलबजावणी करणारा बेलीफ वर्ग व शिपाई अशी रचना आहे.

न्यायालयातील कर्मचारी वर्ग हा न्यायाधीशांना न्यायालयातील प्रकरणांची CIS मध्ये नोंदणीप्रमाणे दैनंदिन यादी तयार करणे, दिवाणी व फौजदारी प्रकरणे न्यायाधीशांसमोर ठेवणे, मराठी व इंग्रजी मधून साक्षदारांची बयाणे नोंदविणे न्यायालयाच्या निर्देशानुसार समन्स वारंट काढणे व त्यांची तामीली बेलीफ मार्फत करणे. न्यायाधीशांनी उदघोषित केलेले न्यायनिर्णय, लघुलिपीमध्ये घेवून ते टंकलिखीत करुन देणे तसेच उच्च न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे संगणकावर न्यायालयात रोजच्या रोज ठेवण्यात आलेल्या प्रकरणांचे अपडेशन करणे तसेच प्रकरणांची अदयावत ताळेबंद (Balance Sheet) ठेवणे तसेच निर्णीत अभिलेख नस्तीबध्द करुन अभिलेखागारात पाठविणे इत्यादी कामे करावी लागतात तसेच इतर कर्मचारी आस्थापनेवरील इतर प्रशासकीय कामे करतात.

3) दिवाणी व फौजदारी मामले न्यायालयात दाखल झाल्यापासून न्यायाधीश सदरचे मामले लवकरात लवकर निकाली काढण्याबाबत प्रयत्नशील असतात. तसेच वेळोवेळी उच्च न्यायालयाचे मार्गदर्शनानुसार (Special Drive) आयोजीत करुन त्यानुसार प्रकरणे

निकालात काढली जातात.

4) प्रत्येक न्यायीक अधिका-यांना ठरवून दिलेल्या मानकानुसार न्यायीक प्रकरणे निकाली काढणे आवश्यक असते. तसेच शासनाचे "मराठी भाषेचा वापर" हे धोरण गडचिरोली न्यायीक जिल्ह्यात राबविले जाते. न्यायदानाचे काम जास्तीत जास्त मराठीतून केल्या जाते.

तसेच कर्मचा-यांनाही त्यांच्या पदनिहाय कर्तव्यसुची तयार केलेली असते. त्यानुसार कर्तव्य पार पाडावे लागते.

5) न्यायीक अधिकारी व कर्मचारी हे त्यांचेकडे असलेले किंवा त्यांच्या नियंत्रणात असलेले किंवा त्यांची कर्तव्य पार पाडण्यासाठी कायदयाची पुस्तके, दिवाणी प्रक्रीया संहिता, दिवाणी नियम पुस्तिका, फौजदारी प्रक्रीया संहिता, फौजदारी नियम पुस्तीका, महाराष्ट्र नागरी सेवा नियम तसेच आकस्मीक खर्च नियम, महाराष्ट्र कोषागार नियम तसेच शासनाचे तसेच वेळोवेळी येणा-या उच्च न्यायालयाच्या परिपत्रकाच्या आधारे तसेच न्यायीक अधिका-यांना उच्च न्यायालयातर्फे वेळोवेळी देण्यात येणा-या उजळणी अभ्यासक्रम, प्रशिक्षण, परिसंवाद या आधारे न्यायालयीन तसेच कार्यालयीन कामकाज करण्यात येते.

6) न्यायालयामध्ये न्यायदानाचे काम हे प्रमुख असल्यामुळे दिवाणी व फौजदारी स्वरुपाचे मामले व त्यासंबंधातील दस्तऐवज न्यायालयात असतात तसेच न्यायालयात काम करणा-या कर्मचा-यांचे वेतन तसेच इतर प्रशासकीय बाबी मधील दस्तऐवज कार्यालयात असतात.

7) जिल्हा न्यायालय आपले धोरण तयार करण्याच्या किंवा त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी सल्लागार समिती नेमलेली असते. त्यामध्ये प्रमुख जिल्हा न्यायाधीश हे अध्यक्ष असतात तर जिल्हा न्यायाधीश-1 तथा अतिरिक्त सत्र न्यायाधीश, मुख्य न्यायदंडाधिकारी, दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) हे सदस्य असतात. ते कर्मचा-यांच्या नियुक्ती, पदोन्नती, आगावु वेतनवाढ इत्यादी बाबतीत सर्वानुमते ठराव घेउन प्रश्न निकालात काढतात.

तसेच कर्मचा-यांविरुध्द निवेदने किंवा तक्रार आली असल्यास त्याचे निराकरण प्रमुख जिल्हा न्यायाधीश करतात.

शासनाच्या तसेच उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार जिल्हा न्यायालयात विविध प्रकारच्या समीत्यांची स्थापना करण्यात आलेली असुन त्याद्वारे न्यायालयात प्रकरणांच्या सुनावणीच्या वेळी तसेच इतर कामासाठी येणा-या पक्षकार, आरोपी, अधिवक्ता तसेच

कर्मचारीवर्ग यांच्या समस्यांचे निराकरण करण्यात येते.

8) न्यायालयात येणा-या अशिक्षीत गरजु व्यक्तींना न्यायालयातील प्रक्रीयेचे ज्ञान असणे आवश्यक असते. तसेच आर्थिकदृष्टया कमकुवत असलेल्या व्यक्तीसाठी कायदे विषयक सहाय्य व सल्ला देण्याचे काम जिल्हा विधी सेवा प्राधीकरण करते. प्राधिकरणाचे सदस्य सचिव हे दिवाणी न्यायाधिश (वरिष्ठ स्तर) या पदाचे समकक्ष असतात तर अध्यक्ष प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश असतात.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचा स्वतंत्र कर्मचारी वर्ग अस्तित्वात असुन त्यामध्ये एक अधिक्षक, एक वरिष्ठ लिपीक, एक कनिष्ठ लिपीक, दोन शिपाई, एक कंत्राटी लेखापाल चार कंत्राटी लिपीक, एक कंत्राटी शिपाई कार्यरत आहेत. तसेच विधी सेवा प्राधिकरणाकरीता जिल्हा न्यायालयाचे ईमारतीच्या उत्तर दिशेला जिल्हा प्राधिकरणाची स्वतंत्र व सुसज्ज इमारत असून सदरहु इमारतीस विधी सेवा सदन म्हणून नाव देण्यात आले आहे. तेथे दिनांक 26/11/2016 पासून जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे कार्यालय कार्यरत आहे.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गडचिरोली अंतर्गत कार्यरत "लोक अभिरक्षक कार्यालय" नव्याने स्थापन करण्यात आले असून त्यामध्ये कंत्राटी तत्वावर एक मुख्य लोक अभिरक्षक, एक उप-मुख्य लोक अभिरक्षक, तीन सहाय्यक लोक अभिरक्षक, एक रिसेप्शनिस्ट-कम-डाटा एंट्री ऑपरेटर, एक कंत्राटी शिपाई कार्यरत आहेत.

गरीब/गरजु लोकांना मोफत कायदेविषयक मदत मिळण्याकरीता या कार्यालयातर्फे मोफत वकील पुरविण्यात येते. त्याकरीता या कार्यालयातर्फे पॅनल अधिवक्ता ची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

गरजुंना कायदेविषयक सल्ला मिळावा, याकरीता जिल्हा न्यायालय, गडचिरोली या इमारतीमध्ये एक दर्शनी कक्षाची स्थापना करण्यात आलेली आहे. त्यामध्ये एक वकील व एक विधी स्वयंसेवकाची नेमणूक करण्यात आलेली आहे. ते लोकांना मोफत कायदेविषयक सल्ला देतात. तसेच सामान्य रूग्णालय, गडचिरोली व पोलीस स्टेशन, गडचिरोली येथे विधी चिकित्सालयची स्थापना करण्यात आलेली आहे. तिथे एक वकील व एक विधी स्वयंसेवकाची नेमणूक करण्यात आलेली आहे.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गडचिरोली येथे तसेच कार्यालयाअंतर्गत येणा-या तालुका विधी सेवा समिती येथे विधी स्वयंसेवक कार्यरत असून ते कायदेविषयक जनजागृती करतात.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाची मासिक सभा घेतली जाते यामध्ये जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष, सदस्य सचिव तसेच, पोलीस अधिक्षक व जिल्हाधिकारी हे हजर असतात किंवा त्यांचे प्रतिनिधी त्यांचे गैरहजेरीत सभेमध्ये हजर राहतात. तसेच त्यामध्ये अशासकीय संस्थाचे सदस्य त्या त्या गावातील सन्माननिय नागरिक सभेला हजर राहतात. सदर्हु सभेमध्ये सामाजिक समस्यांबाबत चर्चा करण्यात येते तसेच त्या समस्यांच्या निराकरणाबाबतचे उपाय शोधले जातात.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरणातर्फे निरनिराळे उपक्रम चालविले जातात. त्यामध्ये लोक न्यायालय, कार्यशाळा तसेच जनजागृतीसाठी शिबीराचे आयोजन केले जाते. त्यामध्ये कायदेतज्ञ निरनिराळया कायदयाबाबतची माहिती देतात. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणातर्फे घेतल्या जाणा-या लोकन्यायालयामध्ये तडजोड होण्यासारखी दिवाणी व फौजदारी प्रकरणे ठेवली जातात. तसेच मोटार अपघाताची, बँकेची प्रकरणे किंवा किरकोळ गुन्हयातील प्रकरणे, तसेच पोटगीसंबंधीची प्रकरणे ठेवली जातात व अशी प्रकरणे लोकन्यायालयातील दोन सदस्यांच्या पॅनलसमोर ठेवली जातात. त्यात एक न्यायाधीश व एक समाजसेवक यांचा समावेश असतो. पॅनलवरील सदस्य हे दोन्ही बाजुचे म्हणणे ऐकून त्यांच्यामध्ये तडजोड घडवून आणतात व प्रकरणे निकाली काढतात. त्यामुळे पक्षकारांचा वेळ, पैसा तसेच त्यांचा मानसिक व शारिरिक त्रास वाचतो. पॅरालीगल प्रशिक्षण अंगणवाडी सेवीका तसेच इतर शासकीय विभागातील इच्छुक अधिकारी/कर्मचारी यांचेसाठी कायदेविषयक प्रशिक्षणाचा कार्यक्रम आयोजीत केला जातो.

जिल्हा न्यायालयामध्ये दाखल झालेल्या प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्याकरिता मध्यस्थी केंद्र तथा समुपदेशन केंद्राची स्थापना केली आहे. त्यामध्ये जेष्ठ विधीज्ञ यांची मध्यस्थी म्हणून नियुक्ती केल्या जाते व जिल्हा स्तरावर तसेच तालुका न्यायालयात सुध्दा मध्यस्थी केंद्रातर्फे प्रकरणे तडजोडीने निकाली काढली जातात. तसेच वाद निवारण केंद्र (Alternative Dispute Act) ची स्थापना करण्यात आली आहे.

9) दिवाणी व फौजदारी नियम पुस्तिका तसेच उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार न्यायालयाचे कामकाज चालते.

10) न्यायालयीन कर्मचा-यांना राज्य शासकिय कर्मचा-यांप्रमाणे वेतन देण्यात येते. तसेच रेडडी आयोगाच्या शिफारशीनुसार सर्व न्यायीक अधिकाऱ्यांना वेतन देण्यात येते.

तसेच न्यायीक अधिकारी/कर्मचारी यांचा सेवेत असतांना मृत्यू झाल्यास मृत्यू नि सेवा उपदान तसेच गटविमा योजनांचा तसेच लिंक इन्शुरन्स तसेच त्यांना इतर जसे भविष्य

निर्वाह निधी, रजा रोखीकरण इत्यादी लाभ देण्यात येतात.

11) अधिकारी/कर्मचारी यांच्या वेतनावरील खर्चाचे तसेच इतर कार्यालयीन खर्चाचे वार्षीक अर्थसंकल्प तयार करण्यात येवून ते शासनाकडे पाठविल्या जाते ते मंजुर झाल्यानंतर, प्रत्येक तालुका स्तरावरील न्यायालयाकरीता त्यांच्या मागणी प्रमाणे अनुदान पुरविण्यात येते.

12) दंड रुपाने शासनाकडे जमा झालेल्या रकमांपैकी काही रक्कम संबंधीत जिल्हयातील ग्रामपंचायतीला त्यांच्या ग्रामपंचायतीकडून दंड रुपाने जमा झालेल्या रकमेच्या प्रमाणात त्यांना अर्थसहाय्य पुरविण्यात येते तसेच जिल्हा तसेच तालुका स्तरावरील वकील संघटनेच्या ग्रंथालयांना सहाय्यक अनुदान पुरविण्यात येते.

13) प्रमुख जिल्हा न्यायाधीश हे न्यायालयातील वकिलांचे काम करणा-या कारकुनांचा त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार वकिलांचे कारकून म्हणून परवाने देण्यात आले आहेत. तसेच न्यायालयातील कामकाजाचा आढावा घेवून आवश्यकतेनुसार अर्जनविसांना परवाना देण्यात येतो.

14) जिल्हा न्यायालयामध्ये संगणकीकरण झालेले असून जनसामान्यांच्या माहितीसाठी सुविधा केंद्र स्थापन करण्यात आलेले आहे. त्यामध्ये दिवाणी तथा फौजदारी प्रकरणांबाबतची सर्व माहिती कोणत्याही वेळी प्राप्त होउ शकते. तसेच कार्यालयीन कामकाज संगणकावर केल्या जाते.

संगणक विभागाकरीता कंत्राटी प्रणाली अधिकारीची दोन पदे मा. उच्च न्यायालयाने कंत्राटी तत्वावर नियुक्ती केली आहे. प्रणाली अधिकारी हे संगणक विभागाचे संगणकीय कामे पाहतात.

मा. उच्च न्यायालयाचे दिशानिर्देशानुसार ई-सेवा केंद्र सुरु केले असून जिल्हा न्यायालय, गडचिरोली मुख्यालयातील ई-सेवा केंद्र दिनांक 02/06/2021 रोजी सुरु करण्यात आले आहे. यामध्ये प्रकरण दाखल करणे, हार्ड कॉपी प्रकरण स्कॅन करणे, ई-सिग्नेचर समाविष्ट करणे, सि.आय.एस. प्रणालीवर अपलोड करणे, ई-मुद्रांक ऑनलाईन खरेदीसाठी मदत करणे अशी कामे केली जातात. परंतु सध्यास्थितीत कंत्राटी कनिष्ठ सहाय्यकाचे पद रिक्त आहे.

तसेच मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक 01 जानेवारी, 2022 पासुन शासनामार्फत दाखल करण्यात येणारी सर्व न्यायालयीन प्रकरणे/याचिका ई-फायलींग प्रणालीद्वारे दाखल करण्याबाबत निर्देश दिले आहे. यासंदर्भात दिनांक 20/12/2021 रोजी

मा. उच्च न्यायालय, मंबई येथे झालेल्या बैठकीत मा. उच्च न्यायालयाप्रमाणे दुय्यम न्यायालयात देखील शासनामार्फत दाखल होणारी सर्व न्यायालयीन प्रकरणे/याचिका इत्यादी ई-फायलिंग प्रणालीद्वारे दाखल करण्याबाबत निर्णय घेण्यात आला.

तसेच शासनानी किंवा उच्च न्यायालयाने वेळोवेळी मागीतलेली माहिती ई-मेलद्वारे त्वरीत पुरविल्या जाते. तसेच आवश्यकता असल्यास व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे न्यायालयातील प्रकरणात साक्षदारांची साक्ष नोंदविली जाते. तसेच उच्च न्यायालयाशी महत्वाच्या बाबींवर व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे संवाद साधला जातो.

गडचिरोली न्यायीक जिल्हयातील जिल्हा मुख्यालय तसेच तालुका न्यायालयामध्ये दिव्यांग व्यक्तीकरीता व्हील चेअरची व्यवस्था उपलब्ध करुन देण्यात आली आहे. दिव्यांगाना न्यायालयात येतांना त्रास होवू नये म्हणून रॅम्पची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच दिव्यांगाकरिता ब्रेल चिन्हा ची व्यवस्था लावण्यात आली आहे. तसेच गडचिरोली मुख्यालयात पोक्सो अधिनियम अंतर्गत विशेष न्यायालयाची स्थापना करण्यात आली आहे.

15) जिल्हा न्यायालयाचे एक मध्यवर्ती ग्रंथालय आहे. तसेच प्रत्येक न्यायालयाचे आस्थापनेस संलग्न एक ग्रंथालय असून न्यायाधीश व कर्मचारी यांना न्यायदान व कार्यालयीन कामकाजाच्या उपयोगासाठी उपलब्ध आहे. ग्रंथालयातील पुस्तके सांभाळण्याची व व्यवस्था पाहण्याची जबाबदारी ही ग्रंथालय लिपीकाची आहे. तसेच वकील संघाचे स्वतंत्र ग्रंथालय आहे. तसेच न्यायाधीशांचे वापराकरीता त्यांचे निवासी ग्रंथालय आहे.

जिल्हा न्यायालयास उपलब्ध झालेल्या निधीमधुन ग्रंथालय समितीद्वारे पुस्तकांची खरेदी केल्या जाते व आवश्यकतेनुसार पुस्तके जिल्हा न्यायालयाचे मध्यवर्ती तसेच दुय्यम न्यायालयातील ग्रंथालयास पुरविले जातात.

16) केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम 2005 मध्ये अंशत: बदल करुन उच्च न्यायालयाने जिल्हा न्यायालयाचा माहितीच्या अधिकाराचा कायदा 2009 तयार केला आहे व त्यानुसार सदर अधिनियम जिल्हा न्यायालयाला लागु करण्यात आला आहे. त्यामध्ये दिलेल्या निर्देशानुसार जिल्हा न्यायालयाने प्रबंधक, जिल्हा न्यायालय, गडचिरोली यांना जन माहिती अधिकारी तसेच अधिक्षक (वित्त/प्रशा.) सहाय्यक अधिक्षक (अभिलेखागार) यांना "सहाय्यक जनमाहिती अधिकारी" म्हणून जिल्हा न्यायालयाचे आदेश क्रमांक बी (49)/प्रबंधक/11/2007, दिनांक 09 जानेवारी, 2007 अन्वये नेमणुक केली आहे.

सदर उच्च न्यायालयाचे जिल्हा न्यायालयाचा माहितीच्या अधिकाराचे नियम 2006 यामध्ये अंशत: सुधारणा करुन नवीन जिल्हा न्यायालयाचा माहितीच्या अधिकाराचे नियम 2009 तयार केले आहेत. त्यानुसार अर्जावर कार्यवाही केली जाते.

तसेच अपीलीय प्राधिकारी म्हणुन मा. जिल्हा न्यायाधीश-1 तथा अतिरिक्त सत्र न्यायाधीश, गडचिरोली यांची नियुक्ती जिल्हा न्यायालयाचे आदेश क्रमांक बी-(49)/प्रबंधक/624/2009, दिनांक 20 नोव्हेंबर, 2009 अन्वये केलेली आहे.

| | |
|---|---|
| 1) जनमाहिती अधिकारी | प्रबंधक<br>जिल्हा न्यायालय, गडचिरोली |
| 2) सहाय्यक जनमाहिती अधिकारी | 1) अधिक्षक(वित्त/प्रशा.)<br>जिल्हा न्यायालय, गडचिरोली.<br>2) सहाय्यक अधि.(अभिलेखागार)<br>जिल्हा न्यायालय, गडचिरोली. |
| 3) अपीलीय अधिकारी | मा. जिल्हा न्यायाधीश- 1 तथा<br>अतिरिक्त सत्र न्यायाधीश,<br>गडचिरोली. |

या विभागातील विविध विभागाकडे जनतेकडून माहितीचा अधिकार अधिनियमांतर्गत आलेल्या अर्जांना अधिनियमात विहित केलेल्या 30 दिवसांच्या मुदतीत माहिती अधिका-याकडून उत्तर पाठविले जाते. तसेच अपिलीय प्राधिका-याकडून या संबंधातील अपीलांना विहीत 45 दिवसात सुनावणी करुन उत्तर दिले जाते. तसेच कार्यालयातील कामकाजाच्या विलंबास प्रतिबंध करण्याबाबत शासनाने लागू केलेल्या अधिनियम, 2005 नुसार प्रकरणे विहीत कालावधीत निकाली काढण्याची जबाबदारी सर्व अधिकारी व कर्मचा-यांवर आहे. या संबंधात विवरणपत्र - 1 सोबत जोडले आहे.

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश,
गडचिरोली

## विवरणपत्र - 1

## नागरिकांची सनद (Citizen Charter)

| कार्यालयाचे नांव | जनतेस देण्यात येणा-या सेवा (स्तर नमुद करावा) | त्यासाठी कोणकोणत्या कागदपत्रांची आवश्यकता आहे | सेवा देणारे अधिकारी(सेवानिहाय प्राधीका-यांचे नांव नमुद करावे) | सेवा पुरविण्यास लागणारा कालावधी(निर्धारीत विहित/सर्वसाधारण) | अपील असल्यास अपीलीय प्राधीकारी आणि अपील करण्याचा विहित कालावधी | सेवा पुरविल्या न गेल्यास तक्रार(असल्यास) ती कोणाकडे करावयाची(पदनाम व पत्ता) |
|---|---|---|---|---|---|---|
| जिल्हा व सत्र न्यायालय, गडचिरोली | 1)जनतेकडून माहितीच्या अधिकार अधिनियमांतर्गत आलेल्या अर्जांना उत्तरे<br><br>2) जनतेकडून माहितीच्या अधिकार अधिनियमांतर्गत आलेल्या अपीलांना उत्तरे | 1) सामान्य प्रशासन विभागाने विहित केलेल्या नमुन्यामध्ये अर्ज करावा. अर्जावर रु. 10/- चे कोर्ट फी स्टॅम्प तिकिट लावावे.<br><br>2) दारिद्रय रेषेखालील असल्यास त्याबाबतचे प्रमाणपत्र जोडावे. | 1) श्री. एम.सी.चव्हाण, अधिक्षक (प्रशासन/वित्त) तथा सहाय्यक जनमाहिती अधिकारी<br><br>2)सौ.एस.एस.बारसागडे, सहा.अधिक्षक (अभिलेखागार) तथा सहाय्यक जनमाहिती अधिकारी<br>3) श्री.एम.सी.चव्हाण, प्रभारी प्रबंधक व प्रभारी जनमाहिती अधिकारी<br>4)श्री.यु.एम.मुधोळकर, अपीलीय प्राधिकारी /जिल्हा न्यायाधीश -1 तथा अतिरिक्त सत्र न्यायाधिश, गडचिरोली | 1) माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज प्राप्त झाल्याच्या दिनांका पासून 30 दिवस, सहाय्यक जनमाहिती अधिका-याकडे परस्पर अर्ज प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून 35 दिवस<br>2) अपिलीय प्राधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून 30 दिवस<br>3) सर्वसाधारण 45 दिवस | 1) अपिलीय प्राधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून 30 दिवस उत्तर मिळाल्यापासून 90 दिवसात मुख्य राज्य माहिती आयोग यांच्याकडे | 1) राज्य माहिती आयोग<br><br>2) प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, गडचिरोली |

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश,
गडचिरोली.